# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२,शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

☎ २५६५६२३४, फॅक्स २५६५६२३४, E-mail : ropune.dte@gmail.com


**कालमर्यादा**

जा.क्रं. विकापु/आस्था-१/वश्रेनिश्रे/२०११/७८३९ दिनांक : 2 2 SEP 2011

प्रति,

प्राचार्य,

शासकीय तंत्रनिकेतन पुणे/सोलापूर/कोल्हापूर/मिरज/कराड/अवसरी/ तासगाव

शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन पुणे

म.रा. हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नॉलाजी पुणे,

उपसचिव, तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ विभागीय कार्यालय पुणे

**विषय :- शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्यात्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या करिअर ॲडव्हॉसमेंट योजनेअंतर्गत वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी प्रदान करणेबाबत.**

**संदर्भ :- संचालक तंत्रशिक्षण मुंबई यांचे कार्यालयातील दिनांक २२.०९.२०११ रोजीचा दूरध्वनी**

महोदय,

शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्यात्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या करिअर ॲडव्हॉसमेंट योजनेअंतर्गत वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी प्रदान करणेबाबतची कार्यवाही संचालनालय स्तरावर विचाराधिन असून प्रस्ताव तयार करुन दिनांक २८-९-२०११ पर्यंत या कार्यालयामार्फत सादर करण्याविषयी उपरोंक्त संदर्भान्वये कळविण्यात आले आहे.

अद्याप पर्यंत निर्गमित केलेल्या वरिष्ठश्रेणी/निवडश्रेणी मंजरी आदेशानुसार काही प्रकरणात त्रुटी आहेत तर काही प्रकरणे आक्षेपामुळे/अपुर्ण कागदपत्रामुळे/पुर्वसेवेमुळे प्रलंबित असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच काही प्रकरणाचे पुर्नविलोकण करणे आवश्यक आहे अशी सर्व प्रकरणे निकाली काढण्याच्या अनुषंगाने आपले संस्थेत कार्यरत असलेल्या व दिनांक ३१-१२-२००५ पर्यंत पात्र असणाऱ्या अधिव्याख्यात्यांना सदरची योजना लागू करण्याबाबतचे प्रस्ताव दिनांक २६.९.२०११ पर्यंत या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. प्रस्ताव सादर करताना खालील सुचना विचारात घेण्यात याव्यात.

१) **प्रपत्र अ / ब मध्ये माहिती ए-३ साईज पेपरवर आयएसएम DVTT Natraj या फॉन्ट वापरुन एमएसवर्ड मध्ये टंकलिखीत करुन ई-मेलद्वारे (est.ropune@gmail.com ) पाठवावी व ४ प्रतीत कागदपत्रांसह संबधित कर्मचा-यामार्फत हस्तदेय सादर करावीत.**

२) **विवरण पत्रामधील अनुक्रमांक ४ ते १० मध्ये नमूद केलेली आवश्यक ती सर्व कागदपत्रे विवरणपत्रातील क्रंमाकानुसार लावून सादर करावीत.**

३) **आवश्यक त्या सर्व कागदपत्राच्या साक्षांकित प्रती सादर कराव्यात**

अपूर्ण प्रस्ताव सादर केल्यास किंवा विलंब होऊन संबधितांचे नुकसान झालेस संबधीत अध्यापक व कार्यालय प्रमुख हेच जबाबदार राहतील यांची कृपया नोंद घ्यावी.

सोबत प्रपत्र अ व ब

(डी.एन.शिंगाडे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत- १) संचालक, तंत्र शिक्षण म.रा.मुंबई यांना माहिती साठी सादर

२) संगणक विभाग संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

संस्थेचे नाव :-

# विवरणपत्र-अ

## वरिष्ठ श्रेणीसाठी दिनांक ३१/१२/२००५ पर्यंत पात्र अधिव्याख्यात्यांची माहिती

| अ. क्र. | अधिव्याख्यात्याचे नांव व संस्था | नियमित नियुक्तीचा दिनांक व संचालनालयाने नियुक्तीस मान्यता दिलेल्या पत्राचा क्रमांक व दिनांक | पूर्व सेवेचा तपशिल | परिविक्षा कालावधीत उलभोगलेल्या रजेचा तपशिल | परिविक्षा कालावधी पूर्ण केलेल्या दिनांक (आदेश क्रमांक व दिनांकासह) | शैक्षणिक अर्हता (श्रेणी व वर्षासह) | गोपनीय अहवाल प्रतवारी | मान्यता प्राप्त उजळणी वर्गाचा तपशिल | पूर्वी वरिष्ठ श्रेणी दिल्याचा दिनांक व कार्यालयीन आदेश क्रमांक व दिनांक | प्रस्तावित वरिष्ठ श्रेणी | छाननी समितीचे अभिप्राय | निवड समितीचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

संस्था प्रमुखांची स्वाक्षरी

---

संस्थेचे नाव :-

# विवरणपत्र-ब

## निवड श्रेणीसाठी दिनांक ३१/१२/२००५ पर्यंत पात्र अधिव्याख्यात्यांची माहिती

| अ. क्र. | अधिव्याख्यात्याचे नांव विद्याशाखा व संस्था | नियमित नियुक्तीचा दिनांक व संचालनालयाने नियुक्तीस मान्यता दिलेल्या पत्राचा क्रमांक व दिनांक | पूर्व सेवेचा तपशिल | परिविक्षा कालावधीत उलभोगलेल्या रजेचा तपशिल | परिविक्षा कालावधी पूर्ण केलेल्या दिनांक (आदेश क्रमांक व दिनांकासह) | शैक्षणिक अर्हता (श्रेणी व वर्षासह) | गोपनीय अहवाल प्रतवारी | वरिष्ठ श्रेणी/ प्रस्तावित वरिष्ठ श्रेणी दिनांक | पूर्वी निवड श्रेणी दिल्याचा दिनांक व कार्यालयीन आदेश क्रमांक व दिनांक | प्रस्तावित निवड श्रेणी | छाननी समितीचे अभिप्राय | निवड समितीचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

संस्था प्रमुखांची स्वाक्षरी